**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका**
**सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक ३७ )**
**गुरुवार, दिनांक ३/१०/२०२४, दुपारी ४.३० वाजता**

**पुणे महानगरपालिकेची मासिक (सर्वसाधारण) सभा (माहे ऑक्टोंबर २०२४ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक ३/१०/२०२४ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात भरली होती.**

**सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ. राजेन्द्र ब भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| मा. संदीप कदम | – | उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन |
| मा. प्रतिभा पाटील | – | उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग |
| मा. नितीन उदास | – | उप आयुक्त, समाज विकास विभाग |
| मा. किशोरी शिंदे | – | उप आयुक्त, भांडार विभाग |
| मा. आशा राऊत | – | उप आयुक्त, शिक्षण विभाग |
| मा. अनिरुध्द पावसकर | – | मुख्य अभियंता, पथ विभाग |
| मा. नंदकिशोर जगताप | – | मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग |
| मा. ॲड.निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकारी |
| मा. डॉ.संजीव वावरे | – | सह. आरोग्य प्रमुख |
| मा. मनिषा शेकटकर | – | प्र.अधि.अभियंता, विद्युत विभाग |
| मा. तांदळे | – | अधिक्षक अभियंता, मलनिःसारण विभाग |
| श्रीमती योगिता भोसले | – | प्रभारी नगरसचिव |

**मा. डॉ राजेन्द्र ब भोसले,भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे अध्यक्षस्थानी होते.**

**प्र.नगरसचिव :** माहे ऑक्टोंबर २०२४ कार्यपत्रिका. कार्यपत्रिकेवर दाखल करुन घेणेसाठी खालील विषय आलेले आहेत.

**दाखल विषय**

**विषय क्रमांक :-१/२०६**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/७०२,दि.१/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.१, दि.३/१०/२०२४

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील प्रशासन अधिकारी या पदाच्या सेवाज्येष्ठता यादीतील सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक आयुक्त, वर्ग-१ या पदावर तात्पुरती पदोन्नतीने खालील सेवकाची नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा संवर्ग | शैक्षणिक पात्रता | जात वैधता प्रमाणपत्र आहे / नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.प्रकाश महादेव मोहिते | खुला | सेवाज्येष्ठतेने | बी.ए. | लागू नाही. |

**विषय क्रमांक :-२/२०७**

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांनी दि.२०/५/२०२४ रोजी घेतलेल्या दिव्यांगांच्या बैठकीचे इतिवृत्त तसेच दिव्यांग संघटनांनी वेळोवेळी केलेली आंदोलने.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाजविकास/५८७,दि.१९/९/२०२४
३) मा.महिला व बाल कल्याण समितीचा ठराव क्र.१०,दि.३०/९/२०२४
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३०, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

समाज विकास विभागामार्फत दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत राबविणेत येणाऱ्या विविध योजनांमध्ये दिव्यांग व्यक्तिंच्या मागण्यांनुसार अंशत: बदल करणेकरिता खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या तक्त्यामध्ये दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत राबविणेत येणाऱ्या योजनांमध्ये अंशत: बदल करणेस. तसेच दिवांग कल्याणकारी योजना अंतर्गत मा.महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे योजनांची मान्यता प्राप्त झाल्यापासून अंमलबजावणी करणेस. सदरील योजनांकरिता दरवर्षी तरतूद करणे व सदरचा खर्च ४ड दिव्यांग कल्याणकारी योजना निधी अंतर्गत करणेस.

२) महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग-२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२,दिनांक २७ जून २०२४ नुसार समाज विकास विभागामार्फत दिव्यांग कल्याणकारी योजना अंतर्गत राबविणेत येणाऱ्या सर्व योजनांचा लाभ मिळविण्यासाठी वैश्विक ओळखपत्र ( Unique Disability Identity Card-UDID Card ) बंधनकारक करणेस.

३) दिव्यांग कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेण्याचे योजनांचे नियम अटीमध्ये कालानुरूप बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देणेस.

**<u>विषय क्रमांक :-३/२०८</u>**

**संदर्भ-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/६९४,दि.१/१०/२०२४
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३२, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे मनपाच्या ताब्यात असणाऱ्या पुणे पेठ बावधन खुर्द स.नं.५४/१अ/१+/अ/४+१/अ/५ पुणे येथे डिसाईन -बील्ट-फायनान्स-ऑपरेट-ट्रान्सफर (DBFQT) तत्वावर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल १० वर्षे कराराने चालविण्यास देणे ( टेंडर क्र.२० सन २०२३-२४) कामी निविदा मागविली असता निविदाधारक ऑस्कर हॉस्पीटल यांची एकच निविदा प्राप्त झाल्याने त्यांचेसोबत करारनामा करणेस खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ बावधन खुर्द स.नं.५४/१अ/१+/अ/४+१/अ/५ पुणे येथे डिसाईन -बील्ट-फायनान्स-ऑपरेट-ट्रान्सफर (DBFQT) तत्वावर मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल १० वर्षे कालावधीकरीता चालविणेस व १० वर्षानंतर तत्कालीन प्रचलित नियमानुसार १० वर्षे मुदतवाढ असे दोन मुदतवाढ देऊन कराराने ऑस्कर हॉस्पीटल,गणेशनगर, कांदिवली (वेस्ट) मुंबई-४०००६७ यांना चालविणेस देणेस.

२) ऑस्कर हॉस्पीटल,गणेशनगर, कांदिवली (वेस्ट) मुंबई-४०००६७ यांचेकडून पुणे मनपास मोबदला म्हणून प्रती वर्षी र.रू.२० लक्ष व यामध्ये ३% वाढ प्रती वर्षी घेणेस तसेच १०% बेडस् मोफत पुणे मनपास देणेस व १५% बेडस् सीजीएसएस दरामध्ये बेडस् उपलब्ध होणेस.

**<u>विषय क्र.४/२०९</u>**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७६८ दि. ३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३३,दि.३/१०/२०२४

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे -

सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक **अ** चे रक्कम रूपये ७९,६९,७८,००,००० व अंदाजपत्रक **क** चे रक्कम रूपये १५,४५,२२,००,००० असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रूपये ९५,१५,००,००,००० चे अंदाजपत्रकास मा.मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे असून सदरच्या जमा खर्चास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**अंदाजपत्रक अ**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल २०२३ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०२३-२४ मधील जमा | ७०,०३,७०,२८,४३६ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | ७०,०३,७१,२८,४३६ |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०२३-२४ मधील खर्च | ६४,५८,१९,१८,६१२ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |

| | | |
|---|---|---|
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | ६४,५८,२०,१८,६१२ |
| ४ | वर्षात येणारी शिल्लक | ५,४५,५१,०९,८२४ |
| ५ | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम ( २०२३-२४ मधील अप्रत्यक्ष खर्च ) | ३६,८०,००,००० |
| ६ | अंदाजपत्रकाची **अ** ची सन २०२३-२४ ची एकूण शिल्लक | ५,०८,७१,०९,८२४ |

अंदाजपत्रक **क**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | दिनांक १ एप्रिल २०२३ ची शिल्लक | १,००,००० |
| २ | सन २०२३-२४ मधील जमा | १२,५५,७८,६०,४१९ |
| ३ | आरंभीच्या शिलकेसह जमा | १२,५५,७९,६०,४१९ |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| १ | सन २०२३-२४ मधील खर्च | १८,७७,३६,६४,९४१ |
| २ | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | १,००,००० |
| ३ | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | १८,७७,३७,६४,९४१ |
| ४ | अंदाजपत्रकाची **क** ची सन २०२३-२४ ची तूट | ६,२१,५८,०४,५२२ |

| | | |
|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकाची अ ची सन २०२३-२४ ची शिल्लक | ५,०८,७१,०९,८२४ |
| २ | अंदाजपत्रकाची क ची सन २०२३-२४ ची तूट | ६,२१,५८,०४,५२२ |
| ३ | अंदाजपत्रकाची अ व क ची सन २०२३-२४ ची तूट | १,१२,८६,९४,६९८ |

सन २०२३-२४ चे हिशोबामध्ये रक्कम रूपये १,१२,८६,९४,६९८ इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.

| निधी | | |
|---|---|---|
| १ | भांडवली निधी | १,१२,८६,९४,६९८ |
| | | |
| | एकूण | १,१२,८६,९४,६९८ |

**विषय क्रमांक :-५/२१०**

**संदर्भ-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७६९,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३४, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड-ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटीतून प्रभाग क्र.१७ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.७५ लक्षचे एकूण ३ कामांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड-ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटी | ७५ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे -<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१७ मधील दगडी नागोबा येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | --- | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१७ मधील भवानी पेठ, बुधवार पेठ, शुक्रवार पेठ येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१७ मधील विविध ड्रेनेज चेंबर समपातळीत करणे व चेंबर दुरूस्ती करणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्रमांक :–६/२११**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/७७३,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३५, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

पुणे महानगरपालिकेचे अस्तित्वातील ४ मैलापाणी शुध्दीकरण केंद्राची वार्षिक देखभाल व दुरूस्तीसाठी उपलब्ध झालेली तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम७२(ब) प्रमाणे सदर मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांच्या दरवर्षीच्या ऑपरेटिंग व देखभाल दुरूस्तीसाठी आवश्यक रक्कमेचे दायित्व पत्करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिकेचे अस्तित्वातील बोपोडी STP ०१ वर्ष, एरंडवणा STP व तानाजीवाडी STP ०२ वर्ष तसेच मुंढवा STP ०५ वर्षे या मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांची वार्षिक देखभाल व दुरूस्तीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(ब) प्रमाणे ऑपरेटिंग व देखभाल दुरूस्तीसाठी सन २०२५–२६ मध्ये १४०३ लक्ष व सन २०२६–२७ मध्ये १३५० लक्ष तसेच सन २०२६–२७ नंतर प्रत्येक वर्षी खात्यास १५ टक्के प्रमाणे वाढवून आवश्यक रक्कमेचे दायित्व पत्करणेस.

**विषय क्रमांक :–७/२१२**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि:सारण/७७४,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३६, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण ५ कामांचे रक्कम रूपये २५० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे.एकूण उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटी | २५० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>१) प्रभाग क्र.१९ मध्ये लोहियानगर भागात गल्ली क्र.१,२,३ मध्ये मुख्य व्यासाची ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे. | --- | ५० लक्ष |
| २) प्रभाग क्र.१९ मध्ये अशोकनगर कॉलनी मधील ड्रेनेज दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | ५० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१९ मध्ये सोनमार्ग टॉकीज ते भिमाले संकुल व काशेवाडी भागात मुख्य व्यासाची ड्रेनेज दुरूस्त करणे. | --- | ५० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१९ आदर्श बाल मंडळ ते जयलीला एजन्सी परिसरात ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | ५० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१९ मधील ५१२ हरकानगर व वीर गोगादेव मंदिर परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे. | --- | ५० लक्ष |

**विषय क्रमांक :–८/२१३**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि/७७५,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३७, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग अंतर्गत खालीलप्रमाणे एकूण १२ कामांचे रक्कम रूपये ६०० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे. | ६०० लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| नवीन सुचविलेली कामे –<br>मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>१) प्रभाग क्र.१७ मधील तेल घाणी अशोक चौक नाना पेठ येथील ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१७ मधील नाना पेठ पोलीस चौकीमागे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१७ मधील हिंदमाता चौक ते साखळीपीर तालीम ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१७ मधील साखळीपीर तालीम ते डोके तालीम ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१७ मधील रास्ता पेठ इंडियन बँक ते आझाद आळी येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ५० लक्ष |
| ६) प्रभाग क्र.१७ मधील आझाद आळी ओपेल स्केअर ( नाना पेठ ) येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ५० लक्ष |
| ७) प्रभाग क्र.१७ मधील गणेश पेठ बुरूडी पूल कल्व्हर्ट दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १०० लक्ष |
| ८) प्रभाग क्र.१७ मधील शुक्रवार पेठ पोलीस चौकी ते विजय मारूती चौक येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १०० लक्ष |
| ९) प्रभाग क्र.१८ मधील ताडीगुत्ता चौक ते महात्मा फुले परिसरात ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १०० लक्ष |
| १०) प्रभाग क्र.१८ मधील मनपा वसाहत के.८ व ९ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ५० लक्ष |
| ११) प्रभाग क्र.१८ विजय वल्लभ शाळा गंज पेठ परिसरात ड्रेनेज लाईन करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| १२) प्रभाग क्र.१८ अंगरशा तकिया ६३३ गंज पेठ परिसरातील जुनी ड्रेनेज लाईन बदलणे व दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्रमांक :–९/२१४**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि:सारण /७७६,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३८, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

प्रभाग क्र.२७ मधील अशोका म्युज सोसायटी शेजारील भैरोबा नाल्याच्या कडेने सीमाभिंत बांधणेसाठी र.रू.१०० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग, बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे.एकूण उपलब्ध तरतूद–८० कोटी | १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग<br>प्रभाग क्र.२७ मधील अशोका म्युज सोसायटी शेजारील भैरोबा नाल्याच्या कडेने सीमाभिंत बांधणे | --- | १०० लक्ष |

**विषय क्रमांक :–१०/२१५**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७७७,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७३९, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक,बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटीतून प्रभाग क्र.१७ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लक्षचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटी | ४० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१७ मधील नाना पेठ परिसरात विविध गल्लीबोळ कॉक्रीटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.१७ मधील आर्यभूषण थिएटर परिसरात विविध गल्लीबोळ कॉक्रीटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१७ मधील गणेश पेठ येथील गुरूद्वारा परिसरात विविध गल्लीबोळ कॉक्रीटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१७ मधील ताराचंद हॉस्पीटल परिसरात फुटपाथ दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |

<u>विषय क्रमांक :–११/२१६</u>

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७७८,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४०, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक,बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटीतून प्रभाग क्र.१८ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.६५ लक्षचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक, बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटी | ६५ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१८ मध्ये विशाल मित्र मंडळ शुक्रवार पेठ परिसरात फुटपाथ दुरूस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.१८ मध्ये भगवान पार्श्वनाथ जैन मंदिर परिसरात फुटपाथ करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१८ मध्ये गुरूवार पेठ परिसरात विविध फुटपाथ विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१८ मध्ये कस्तुरे चौक ते मिठगंज पोलीस चौकी येथे फुटपाथ करणे व दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१८ मध्ये पुणे कर्मशाळा कोठी ते घोरपडे पेठ उद्यान व झगडेवाडी फुटपाथ दुरूस्ती विषयक व तद्नुषंगिक कामे करणे. | --- | २० लक्ष |
| ६) प्रभाग क्र.१८ मध्ये मासे आळी परिसरातील कल्याणकर बोळ येथे कॉक्रीटीकरण विषयक कामे करणे. | --- | ५ लक्ष |

<u>विषय क्रमांक :–१२/२१७</u>

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७७९,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४१, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटीतून प्रभाग क्र.१८ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१५ लक्षचे एकूण २ कामांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटी | १५ लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१८ मध्ये मराठा भांडेवाल्याची धर्मशाळा गुरूवार पेठ येथे ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.१८ मध्ये मॅनहोल चेंबर लाईन मधील कामगारां मार्फत गाळ काढण्याची कामे करणे. | --- | ५ लक्ष |

**विषय क्रमांक :–१३/२१८**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७८०,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४२, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक,बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटीतून प्रभाग क्र.१८ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.७५ लक्षचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक, बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटी | ७५ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१८ मधील वनराज मंडळ ते राष्ट्रभूषण चौक येथील फुटपाथ दुरूस्ती करणे. | --- | १५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१८ मधील शाहू चौक मित्र मंडळ परिसरातील गल्लीबोळ कॉक्रीटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१८ मधील बावन बोळ परिसरातील गल्लीबोळ कॉक्रीटीकरण करणे. | --- | १५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१८ मधील शितळादेवी चौक परिसरातील रस्ते दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १५ लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१८ मधील नाईक हॉस्पीटल परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १५ लक्ष |

**विषय क्रमांक :–१४/२१९**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७८१,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४३, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटीतून प्रभाग क्र.१९ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.७० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग,सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटी | ७० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील जय भारत मित्र मंडळ परिसरामधील ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील बालाजी मंदिर परिसरामधील ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील ज्योतिर्लिंग गृहरचना येथील गल्ली नं.१ कांबळे गल्ली येथील परिसरामधील ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील गल्ली नं.२ मातंग युवक आघाडी मंडळ परिसरामधील ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्रमांक :–१५/२२०**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/७८३,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४४, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक,बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटीतून प्रभाग क्र.१७ व प्रभाग क्र.१८ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१२५ लक्षचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक, बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटी | १२५ लक्ष | ––– |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१७ परदेशी वॉशिंग सेंटर येथील परिसर कॉक्रीटीकरण करणे. | ––– | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१७ मधील डोके तालीम ते साखळीपीर तालीम नाना पेठ भाजी मंडई येथे फुटपाथ करणे. | ––– | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१७ मधील साखळीपीर तालीम ते नेहरू रोड पर्यंत फुटपाथ दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | २५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१७ मधील शिराळ रोड चौक ते श्रीकला मिसळ रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | ––– | २५ लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१८ मधील चंदन स्वीट ते रामोशी गेट पोलीस चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ––– | २५ लक्ष |

**विषय क्रमांक :–१६/२२१**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८१०,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४५, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

केशव नगर मुंढवा खराडी ( जॅकवेल) येथे अचानक डासांबाबत उध्दभवलेल्या परिस्थितीवर मात करणेसाठी तातडीने ड्रोन यंत्राने डासनाशक औषधाची फवारणी करणे या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार M/s ARIAL MAPPERS & SURVEYORS LLP,PUNE यांचेकडून प्रती दिन ९००००/–+१८ टक्के जी.एस.टी.या दराने ९ दिवसांकरिता करून घेण्यात आलेल्या कामाचे रक्कम रू.९,५५,८००/– जी.एस.टी.सहचे बिल सन २०२४–२०२५, बजेट कोड–RE17F121A या अर्थशिर्षकावर खर्ची टाकले असल्याने सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**विषय क्रमांक :–१७/२२२**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उद्यान/८१२,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४५, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

राजीव गांधी प्राणी संग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यांसाठी जिवंत कोंबडी ( चिकन ) पुरवठा करणे या कामासाठी र.रू.२५ लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| बजेट कोड– RE26B103 नवीन प्राणी, मासे, सर्प खरेदी वाहतूक (प्राणी संग्रहालयातील प्राणी विभागाशी निगडीत आवश्यक कामासाठी वर्गीकरण किंवा प्राणी संग्रहालयातील प्राणी वाहतुकीसाठी वाहन ) | २५ लक्ष | ––– |
| नविन सुचविलेले काम –<br>उद्यान विभाग<br>बजेट कोड– RE26B104 ( प्राण्यांसाठी खाद्यपदार्थ )<br>राजीव गांधी प्राणी संग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यांसाठी जिवंत कोंबडी ( चिकन ) पुरवठा करणे | ––– | २५ लक्ष |

विषय क्रमांक :–१८/२२३

**संदर्भ–** १) महाराष्ट्र राज्याचे मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार साहेब यांच्या कार्यालयाकडून पुणे महानगरपालिकेस दि.७/११/२०२३ रोजी पत्र प्राप्त झालेबाबत श्री.दिपक मानकर,अध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, पुणे शहर यांचे महापालिका आयुक्त कार्यालयाकडील आ.क्र.१०४८,दि.१९/४/२०२३ चे पत्र.

२) मा.वित्तीय समिती बैठक दि.६/८/२०२४ व या बैठकीचे इतिवृत्त जा.क्र.२१०५,दि.२६/८/२०२४

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/८१८,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४७, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

प्रभाग क्र.११ मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१०० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक, पान क्र.४१, ड्रेनेज विभागाकडील कामांच्या याद्या.यादी क्र. D2, बजेट कोड-ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटी | १०० लक्ष | ––– |
| नवीन सुचविलेली कामे –<br>कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालय<br>१) प्रभाग क्र.११, हनुमान नगर, मोरे श्रमिक वसाहत परिसरातील जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.११, राऊतवाडी, राजीव गांधी पार्क परिसरातील जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.११ इंदिरापार्क, वसंतनगर परिसरातील जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | २५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.११ जयभवानीनगर,किष्किंधानगर परिसरातील जुन्या ड्रेनेज लाईनची दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | २५ लक्ष |

विषय क्रमांक :–१९/२२४

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/८१९,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४८, दि.३/१०/२०२४

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड-ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटीतून प्रभाग क्र.१९ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१२० लक्षचे एकूण १२ कामांसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग,सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटी | १२० लक्ष | ––– |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१९ काशेवाडी मधील महाराष्ट्र तरूण मंडळ मागील परिसरात ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | ––– | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.१९ काशेवाडी मधील विशाल क्रांती तरूण मंडळ जवळ ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | ––– | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१९ काशेवाडी मधील म्हसोबा मंदिर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | ––– | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१९ मनपा कॉलनी क्र.१० मधील घर क्र.१ ते २० पर्यंत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | ––– | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.१९ मनपा कॉलनी क्र.१० मधील घर क्र.२० ते ४० पर्यंत ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | ––– | १० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ६) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील अंजुमन मशीद जवळ ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ७) प्रभाग क्र.१९ लोहियानगर मधील ईगल विजय मंडळ जवळ ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| ८) प्रभाग क्र.१९ हरकानगर दत्त मंदिर परिसर, महर्षी हरकादास शाळा समोरील परिसर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| ९) प्रभाग क्र.१९ भवानी माता मंदिर परिसर ८२४ भवानी पेठ परिसर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| १०) प्रभाग क्र.१९ रामोशी गेट मटण मार्केट परिसर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ११) प्रभाग क्र.१९ लोहियानगर अग्निशमन केंद्र समोरील ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे | --- | १० लक्ष |
| १२) प्रभाग क्र.१९ चुडामन तालीम मधील कब्रस्तान मागील परिसरातील ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्रमांक :-२०/२२५**

**संदर्भ-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/स.वि.वि./८३७,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३७६, दि.११/८/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४९, दि.३/१०/२०२४

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या न.वि.गाडगीळ प्रशिक्षण संस्था हे समाज विकास विभागाचा एक भाग असून केवळ २ वेगवेगळे ठराव झाल्याने मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रात नमूद केलेल्या एका ठरावाला शासनाने मान्यता दिली आहे व एक ठराव प्रलंबित आहे,अशी वस्तुस्थिती आहे.सबब समाज विकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रशिक्षण केंद्राकडील मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रात नमूद केलेला तक्ता **अ** प्रमाणे २२ पदांच्या एकूण ४२ जागांची निर्मिती करणेस व **ब** प्रमाणे १ ते १९ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मा.मुख्य सभेची मान्यता मिळाल्यानंतर मे.राज्य शासनाचे आदेश घेणे उचित ठरेल.

**विषय क्रमांक :-२१/२२६**

**संदर्भ-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/८४०,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५०, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार -

सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड-ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटीतून प्रभाग क्र.२९ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लक्षचे एकूण ४ कामांसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभाग,सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड-ZE16C103/PR3-5 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणी पुरवठा करण्याची योजना या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.१०० कोटी | ४० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे -<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.२९ लक्ष्मीनगर व परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.२९ म.फुले वसाहत व परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.२९ पर्वती दर्शन व परिसरात मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.२९ मध्ये पर्वती दर्शन लक्ष्मीनगर भागातील चेंबर्स समपातळीत घेणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्रमांक :-२२/२२७**

**संदर्भ-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/८४१,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५१, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक,बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटीतून कसबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१७ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१०० लक्षचे खालील प्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक, बजेट कोड–CE20A102/A2-2042 पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे या मूळ कामाची उपलब्ध तरतूद र.रू.९० कोटी | १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) कसबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१७ मधील बुधवार पेठ परिसरातील व श्रीकृष्ण टॉकीज परिसरातील गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| २) कसबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१७ मधील तापकीर गल्ली येथील विष्णूपुरा परिसरातील गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) कसबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१७ मधील पालखी चौक परिसरातील बोळात गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ४) कसबा विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१७ मधील रास्ता पेठ, भवानी पेठ, रविवार पेठ भागातील फुटपाथ दुरूस्ती करणे. | --- | २५ लक्ष |

**<u>विषय क्रमांक :–२३/२२८</u>**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/८४२,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५२, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटीतून प्रभाग क्र.१७ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१०० लक्षचे एकूण ४ कामांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२४–२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड–ZE16B102/D2-612 पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे या मूळ कामाची उपलब्ध तरतुद र.रू.८० कोटी | १०० लक्ष | --- |
| नवीन सुचविलेली कामे –<br>उप आयुक्त परिमंडळ क्र.५<br>१) प्रभाग क्र.१७ मधील तेल पाणी अशोक चौक नाना पेठ येथील ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.१७ मधील नाना पेठ पोलीस चौकी मागे ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) प्रभाग क्र.१७ मधील हिंदमाता चौक ते साखळीपीर तालीम ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २५ लक्ष |
| ४) प्रभाग क्र.१७ मधील साखळीपीर तालीम ते डोके तालीम ड्रेनेज लाईन दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | २५ लक्ष |

**<u>विषय क्रमांक :–२४/२२९</u>**

**संदर्भ–** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/८५२,दि.३/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७५३, दि.३/१०/२०२४

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

प्रभाग क्र.२० मधील पीएमसी कॉलनी राजेवाडी पुनर्बांधणी करणे.(स्थापत्य विषयक कामे ) या कामासाठी उर्वरित र.रू.११,३५,६२,३६७ ( अक्षरी र.रू.अकरा कोटी पस्तीस लाख बासष्ट हजार तीनशे सदुसष्ट ) अधिक भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम एवढी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध करणे व त्या अनुषंगाने सन २०२५–२६ मध्ये र.रू.६.०० ( सहा ) कोटी व सन २०२६–२७ मध्ये र.रू.५.३६ कोटी ( पाच कोटी छत्तीस लाख ) इतक्या येणाऱ्या खर्चाचे दायित्व २४ महिन्याकरिता स्विकारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२(ब) अन्वये मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

विषय क्रमांक :–२५/२३०

**संदर्भ–** १) मा.स्थायी समिती ठराव क्र.२००२, दि.१५/३/२०२४
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आपत्ती व्य./७७१,दि.३/१०/२०२४ चे पत्र.

----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व मा.प्रशासक यांचे आदेशानुसार –

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली National Disaster Mitigation Fund अंतर्गत Urban Flood Risk Management Programme (UFRMP) या प्रस्तावातील Integrated Command and Control Centre ( ICCC ) साठी प्राप्त होणारा निधी तसेच या प्रकल्पासाठी MAHAPREIT कडून गुंतवणूक करावयाच्या कामाबाबत सामंजस्य करार करण्यात आला असून खालील बाबीं मुख्य सभेच्या माहिती व अवलोकनार्थ सादर करण्यात यावी.

१) पुणे महापालिका MAHAPREIT व लीडबीडर/फायबर पार्टनर यांचे सोबत Supply Implementation And Monetization Of Fibre Network On Opex Model For Periods Of 20 Years या कामासाठी करावयाच्या त्रिपक्षीय करारनामा मसुदयास मान्यता मिळणे व करारनामा करणेस.

२) मा.महापालिका आयुक्त यांच्या वतीने करार नाम्यावर स्वाक्षरी करण्यासाठी उप आयुक्त ( आपत्ती व्यवस्थापन ) यांना प्राधिकृत करणे.

३) Supply Implementation And Monetization Of Fibre Network On Opex Model For Periods Of 20 Years साठी करारनामा झाले नंतर करारनाम्यातील मुद्दे व बाबींची अंमलबजावणी व कामकाज Urban Flood Risk Management Programme (UFRMP) अंमलबजावणी कक्ष यांचे अंतर्गत करणेस.

**मा.प्रशासक :** सदर विषय दाखल करुन घ्या.

**एकूण २५ विषय दाखल करुन घेतले.**

**मा.प्रशासक :** सेवकांच्या पदोन्नतीचा विषय घ्या.

**विषय क्रमांक :–१/२०६**

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/७०२,दि.१/१०/२०२४ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.१, दि.३/१०/२०२४

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील प्रशासन अधिकारी या पदाच्या सेवाज्येष्ठता यादीतील सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक आयुक्त, वर्ग-१ या पदावर तात्पुरती पदोन्नतीने खालील सेवकाची नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा संवर्ग | शैक्षणिक पात्रता | जात वैधता प्रमाणपत्र आहे / नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.प्रकाश महादेव मोहिते | खुला | सेवाज्येष्ठतेने | बी.ए. | लागू नाही. |

**ठराव क्रमांक :– १७७**

**संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था/७०२,दि.१/१०/२०२४ चे पत्र.**
**२) मा.विधी समिती ठराव क्र.१, दि.३/१०/२०२४**

----

**मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील प्रशासन अधिकारी या पदाच्या सेवाज्येष्ठता यादीतील सेवाज्येष्ठतेनुसार सहाय्यक आयुक्त, वर्ग-१ या पदावर तात्पुरती पदोन्नतीने खालील सेवकाची नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार मान्यता देण्यात येत आहे.**

<u>निवडयादी</u>

| अ.क्र. | सेवकाचे नाव | जातीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा संवर्ग | शैक्षणिक पात्रता | जात वैधता प्रमाणपत्र आहे / नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.प्रकाश महादेव मोहिते | खुला | सेवाज्येष्ठतेने | बी.ए. | लागू नाही. |

**निर्णय : सदर विषय संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.**

**मा.प्रशासक :** आजची सभा शुक्रवार, दिनांक ४/१०/२०२४ रोजी, दुपारी १२.१० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा तहकूब झाल्याचे मा.प्रशासक यांनी जाहीर केले.

सही/-xxx
श्रीमती योगिता भोसले,
प्र. नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दिनांक २९-११-२०२४ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

सही/-xxx
प्रशासक, पुणे मनपा, पुणे.

*******